
Founder



Karmaveer Bhausaheb Hiray

Mahatma Gandhi Vidyamandir's

**MAHILA RATNA PUSHPATAI HIRAY ARTS, SCIENCE & COMMERCE MAHILA MAHAVIDYALAYA , MALEGAON CAMP**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune ID. No. PU/NS/ACS/039/1990
* webside: www.sphcollege.com * E-mail : prinsphmcollege@gmail.com

NAAC ACCREDITED "B" GRADE
Ref.No.C-41629

# Internal Complaint Committee ( ICC)

## (Women Welfare and Grievance Redressal Committee/Vishakha Committee)

## Academic Year: 2023-2024

| Sr.No | Name | Designation | Mob.No |
|---|---|---|---|
| 1 | Prin.Dr.Rajani S Patil | Chairman | 8446431180 |
| 2 | Dr.Rajshri Bhimaraj Sawant. | Coordinator | 7588709066 |
| 3 | Prof.Shankutla Khune | Legal Consultant | 8208438529 |
| 4 | Smt.Sunita Desale | Member NGO | 9673679662 |
| 5 | Dr.Meena F Patil | Member | 7588783400 |
| 6 | Dr.Pradnya Survase | Member | 8552091751 |
| 7 | Dr.Snehal Marathe | Member | 9420589591 |
| 8 | Prof.Shilpa L Yannawar | Member | 9422327249 |
| 9 | Dr.Yogita Ghumare | Member | 9922135735 |
| 10 | Miss.Durga Salunke | Member | 9823222099 |

ACTING PRINCIPAL
M.P.H. Mahila Mahavidyalaya
Malegaon Camp 423105 (Nashik)

**Dr.Rajani Patil**

Mahatma Gandhi Vidyamandir's

**Mahilaratna Pushpatai Hiray Arts, Science and Commerce Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist- Nashik**

**Women Welfare And Grievance Redressal Committee**

**(Internal Complaint Committee)**

**Academic Annual Report 2023-24**

| Sr. No. | Date | Name of the program | Occasion/Name of Activity | Resource person | No. of Participants |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **08/07/2023** | Guest Lecture on Women's Health Issues and Its Treatment | National Doctors Day | Dr. Neha Deshpande-Salunke | 53 |
| 2 | **09/08/2023** | Guest Lecture on 'Health of Tribal Girls' | Tribal Day | Dr. AsavariNathe | 110 |
| 3 | **05/09/2023** | Guest Lecture on 'Empowerment of Women from 'Archaic Educational System to Modern Educational Policy' | Teachers Day | Dr. VinodGorwadkar | 43 |
| 4 | **18/10/2023** | Guest Lecture on 'Women's Health Issues' | NavratriUstav | Dr. Shashikant Vaval<br>Dr. Hemangi Vaval | 69 |
| 5 | **08/03/2024** | Guest Lecture on ' Gender Sensitization' | International Women's Day | Dr. Shakuntala Khune | 83 |
| | | | | | |

Dr. Rajashri Sawant
[ICC Coordinator]

Dr. Rajani Patil
ACTING PRINCIPAL
M.P.H. Mahila Mahavidyalaya
Malegaon Camp 423105 (Nashik)



**Celebration of Tribal Day on 9th August 2023. Dr .Aasavari Nathe Medical Officer guided the students about health issues.**




**Distributions Of Fruits to Aadivasi Girls Hostel on Tribal Day.**




**Chief Guest Dr.Vinod Gorwadkar delivering lecture on "Empowerment Of Women from archaic educational system to modern educational policy.On 5th Sept. 2023.**



**Dr.Shashikant Vavhal ,( Gynaecologist )guided the students on women's health issues on 18th Sept.2023 .**




**Dr.Rajani Patil ,(Principal )guided the students on women's health issues on 18th Sept.2023**




**Dr. Hemangi Vavhal ,( Gynaecologist )guided the students on women's health issues on 18th Sept.2023 on health awareness initiatives during Navratri festival.**




**Adv. Shakuntala Khune addressing the students on Gender Sensitization on the occasion of International women's Day,8th March 2024.**






**Felicitation of Chief Guest by Hon.Principal Dr.Rajani Patil on the occasion of International women's Day,8th March 2024.**

# महिलांच्या आरोग्यविषयक समस्या आणि उपचार या विषयावर वेबिनार संपन्न

मालेगाव कॅम्प – येथील, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात, अंतर्गत तक्रार निवारण समिती द्वारे, (आयसीसी) दि. ८ जुलै २०२३ रोजी, ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ.संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले.

याप्रसंगी, माले–गाव शहरातील सुप्रसिद्ध यशोदा मॅटर्निटी हॉस्पिटल व सोनोग्राफी सेंटरच्या प्रमुख, स्त्रीरोगतज्ञ डॉ. नेहा देशपांडे–साळुंखे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्या आणि उपचार या विषयावर मार्गदर्शन करतांना, महिलांच्या विविध वयोगटात येणाऱ्या आजारांची, उद्भवणाऱ्या समस्यांची आणि त्यावरील उपचारांची सविस्तर माहिती दिली. हिमोग्लोबिनच्या तसेच विटामिन डी च्या कमतरतेमुळे होणारे आजार, वजन वाढीमुळे होणारे आजार इत्यादी विषयी सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, आपल्या दैनंदिन जीवनामध्ये उपकारक बदल केल्याने आजार बरे बरे होण्यास मदत होऊ शकते. कार्यक्रमाप्रसंगी, अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी पाटील म्हणाल्या की, आहार, विहार आणि व्यायाम या त्रीसूत्रीमधून, महिला आपले आरोग्य उत्तम राखू शकतात. धकाधकीच्या जीवनामध्ये महिलांनी मानसिक आरोग्य त्याचबरोबर शारीरिक तंदुरुस्ती याला महत्व दिले पाहिजे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथी मार्गदर्शक यांचा परिचय, समिती अध्यक्ष डॉ. राजश्री सावंत यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.योगिता घुमरे यांनी केले. डॉ. प्रज्ञा सुरवसे यांनी आभार व्यक्त केले.

या प्रसंगी, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के त्याचबरोबर महिला प्राध्यापक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती सदस्य डॉ.मीना पाटील, प्रा. शिल्पा यन्ना–वार, प्रा.प्राजक्ता गाडगे यांनी परिश्रम घेतले.

# आदिवासी दिवस साजरा



मालेगाव:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिला रत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयातील विशाखा समितीच्या माध्यमातून आदिवासी कन्या छात्रालय, मालेगाव कॅम्प येथे दि. ९ ऑगस्ट २०२३ रोजी, आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त मुलींचे आरोग्य याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्या पीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले.

याप्रसंगी, मालेगाव कॅम्प येथील, कॅम्प मॉड्युलर हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.आसावरी नाठे यांनी, विद्यार्थिनींनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत जागृती केली तसेच मासिक पाळीमध्ये शरीरात होणारे अनेक बदल व त्यासंबंधीचा पोषणआहार याबद्दल माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी पाटील अध्यक्षीय मनोगता द्वारे आदिवासी दिवस साजरा करण्यामागची भूमिका विशद करताना म्हणाल्या की, आदिवासी बांधवांनी शिक्षणाच्या व जागृतीच्या मुख्य प्रवाहात येणे ही आता काळाची गरज आहे. विद्यार्थिनींनी स्वतः सक्षम व्हावे. महिलांसंदर्भातील विविध कायदे हक्क याबद्लची माहिती घेऊन जागृत व्हावे असे त्या पुढे म्हणाल्या. यावेळी, कार्यक्रमास उपस्थित कन्या विद्यालयातील सर्व विद्यार्थिनींना फळे वाटप करण्यात आली.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या उप प्राचार्य डॉ.दीपांजली बोरसे व शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाखा समिती अध्यक्ष डॉ. राजश्री सावंत यांनी, सूत्रसंचलन डॉ. मीना पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रज्ञा सुरवसे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी विशाखा समिती सदस्य व आदिवासी कन्या विद्यालयातील शिक्षक भगिनी, शिक्षकेतर भगिनी तसेच विद्यार्थिनी उपस्थित होते.




# महिला महाविद्यालयात आदिवासी दिन

**मालेगाव ।** येथील पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयातील विशाखा समितीतर्फे आदिवासी कन्या छात्रालयात आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त मुलींचे आरोग्य याविषयावर व्याख्यान आयोजित केले गेले. कॅम्प मॉड्युलर रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आसावरी नाठे यांनी विद्यार्थिनींनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत जागृती तसेच मासिक पाळीमध्ये शरीरात होणारे बदल व त्यासंबंधीचा पोषणआहार याबद्दल माहिती दिली. प्राचार्या डॉ. रजनी पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतात आदिवासी बांधवांनी शिक्षणाच्या व विकासाच्या मुख्य प्रवाहात येणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थिनींनी स्वतः सक्षम व्हावे, महिलांसंदर्भातील विविध कायदे हक्क याबद्दलची माहिती त्यांनी दिली. यावेळी कार्यक्रमास विद्यार्थिनींना फळांचे वाटप केले गेले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे व शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक विशाखा समिती अध्यक्ष डॉ. राजश्री सावंत यांनी, सूत्रसंचलन डॉ. मीना पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रज्ञा सुरवसे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, सेवक तसेच विद्यार्थिनी उपस्थित होते.

# महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

मालेगाव कॅम्प:- येथील, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी, महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



सदर कार्यक्रमाचे आयोजन, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ.अपूर्व हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले. यावेळी, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी पाटील यांनी महाविद्यालयीन परिवाराच्या उपस्थितीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्य क्रमासाठी प्रमुख अतिथी व्याख्याते म्हणून मालेगाव कॅम्प म.स.गा. महाविद्यालयाच्या मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक तथा सुप्रसिद्ध नगारा साप्ताहिकाचे संपादक डॉ. विनोद गोरवाडकर हे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विनोद गोरवाडकर यांनी, पुरातन शिक्षण प्रणाली ते आधुनिक शैक्षणिक धोरण याची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. शैक्षणिक धोरण हे मनिसर्ग व ममाणसांनाफ जोडणारे असावे असे स्पष्ट करून त्यांनी शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या ॲनी बेझंट, जे. के. कृष्णमूर्ती, रवींद्रनाथ टागोर व जे. पी. नाईक या विचारवंतांचे स्मरण केले. गुरु-शिष्यांचे नाते, शिक्षकांची जबाबदारी, विद्यार्थ्यांची कर्तव्ये इ. सोदाहरण पटवून दिले.आजचा प्रत्येक विद्यार्थी हा शैक्षणिक व सामाजिक जबाबदाऱ्यांप्रति समर्पित असावा. यासाठी, प्रत्येक विद्यार्थ्याने मउपमन्यूफच्या विचारांचे वाचन करावे असेही त्यांनी सांगीतले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी पाटील यांनी अध्यक्षीय मनोगताद्वारे, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये दिलेल्या आचारांची, विचारांची, व योगदानाची माहिति विद्यार्थिनींना दिली. शिक्षणामुळेच राष्ट्राला प्रज्ञावंत व्यक्ती मिळतात. मशिक्षक जसा परिपूर्ण असावा तसेच आदर्श विद्यार्थी होण्यासाठी विद्यार्थीसुद्धा प्रामाणिक, सजग आणि अनुपालन करणारा असावाफ असे मौलिक विचार त्यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाची सुरुवात विज्ञान शाखेतील वैष्णवी सोनवणे, मोहिनी निकम, भाग्यश्री शेलार, खुशाली भामरे, संजना पवार या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.दिपाली चंद्रमोरे यांनी केले. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ. राजश्री सावंत यांनी उपस्थितांना प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. फरनाज बागबान, साक्षी सूर्यवंशी, हिना पठाण, भाग्यशी शिंदे, चंचल शिरसाट, दिव्या ठोके, ललिता खैरनार, ऐश्वर्या पवार या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली.

सूत्रसंचलन कु.दिव्या ठोके व आभार प्रदर्शन कु. फरनाज बागबान या विद्यार्थिनींनी केले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयं सेविकांनी उपस्थित सर्व प्राध्यापकांना गुलाबपुष्प देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपाजंली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, कार्यालयीन अधिक्षक बी. के. पवार , प्राध्यापक बंधु-भगिनी, कार्यालयीन प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेंडर सेन्सिटायझेशन विषयावर व्याख्यान संपन्न



मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महिला रत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात दि. ९ मार्च रोजी, जागतिक महिला दिनानिमित्त जेंडर सेन्सि टायझेशन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन, महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व प्रशांत हिरे तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. संपदा प्रशांत हिरे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ता म्हणून डॉ. शकुंतला खुणे (विधि महाविद्यालय, मालेगाव) विद्यार्थिनींना संबोधित करताना म्हणाल्या की, महिला सक्षमीकरणासाठी शिक्षणाबरोबरच शारीरिक क्षमता विकसित करण्या साठी दररोज व्यायाम करणे, योगासने करणे, स्वसंरक्षणा साठी कराटे इ. क्लासेस करणे यासारख्या बाबींना महत्त्व देणे आवश्यक आहे. तसेच, स्त्री-पुरुष समानता ही देशाच्या विकासासाठी व जडणघडणीसाठी महत्वपूर्ण आहे. प्रत्येक दिवस हा महिला दिवस आहे.तेंव्हा प्रत्येक दिवसाचा सुविनियोग करावा.वेळेचा सदुपयोग करावा व प्रगति साधावी.

या कार्यक्रमा प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. रजनी पाटील यांनी विद्यार्थिनींना उद्बोधित करताना महिलांचे आर्थिक स्वावलंबन व त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व विशद केले. राष्ट्राच्या प्रगतिसाठी स्त्री व पुरुष या दोहोंचीही जबाबदारी समान आहे. तेंव्हा शिक्षणाचे महत्त्व जाणावे व आपले हित साधावे असेही त्या पुढे म्हणाल्या.

कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक डॉ. मीना पाटील यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. प्रज्ञा सुरवसे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शिल्पा यन्नावार यांनी केले.कार्यक्रमासाठी डॉ. स्मिता हरणे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. दीपांजली बोरसे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. तेजस्विनी सोनटक्के, विद्यार्थिनी, प्राध्यापक वृंद, कार्यालयीन प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.